# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.03.2025** **वारःरविवार**

---

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नागपूर दौऱ्यावर,
- पंढरपूरच्या श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर जीर्णोद्धाराचं काम येत्या आषाढी एकादशीपर्यंत पूर्ण करणार - मुख्यमंत्र्यांची ग्वाही,
- आकाशवाणीवरुन 'मन की बात' द्वारे आज पंतप्रधानांचा संवाद,
- धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार' परमपूज्य रामगिरी महाराज यांना प्रदान आणि
- नवी मुंबई महानगरपालिकेला दोन प्रकल्पांसाठी स्कॉच पुरस्कार.

**नागपूर-दौरा-पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नागपूर भेटीवर येत आहेत. त्यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचं उद्घाटन होणार असून ते रेशीमबाग इथं स्मृती मंदिर आणि दीक्षाभूमीला भेट देणार आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते सोलर डिफेन्स आणि एअरोस्पेस लिमिटेड इथं संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांचं उद्घाटन होणार आहे. यामध्ये मानवरहित हवाई वाहनासाठी बाराशे मीटर लांबीची विशेष धावपट्टी आणि लॉइटरिंग म्युनिशन चाचणीसाठी अत्याधुनिक सुविधा राष्ट्राला समर्पित केली जाणार आहे. तसंच नागपुरातील माधव नेत्रालय केंद्राच्या विस्तारीत प्रकल्पाची पायाभरणीही पंतप्रधानांच्या उपस्थितीत केली जाणार आहे.

**मुख्यमंत्री-तुळजापूर**

तुळजापूरला जागतिक दर्जाचं धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी स्थानिक नागरिकांचा सहभाग घेत शाश्वत विकासाच्या दृष्टीनं तुळजापूर विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचं काल तुळजापूर इथं सांगण्यात आलं. तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंदिर समितीचे अध्यक्ष आणि धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आराखडा सादर केला. या आराखड्याची दोन वर्षात तातडीनं अंमलबजावणी व्हावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

तत्पूर्वी, मुख्यमंत्र्यांनी कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीची विधिवत पूजा करून दर्शन घेतलं. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक, तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

**मुख्यमंत्री**

पंढरपूरच्या श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जीर्णोद्धाराचं काम येत्या आषाढी एकादशीपर्यंत पूर्ण करणार असल्याती ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. पंढरपूर कॉरिडॉरचं काम सर्वांना विश्वासात घेऊन करणार असून संपादन होणाऱ्या जमीन मालकांना सरकारकडून योग्य मोबदला दिला जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. ते म्हणाले –

- बाईट – मुख्यमंत्री - 53 सेकंद

**राष्ट्रपती-शुभेच्छा**

भारतीय नववर्षाची सुरुवात असलेले सण भारताची सांस्कृतिक विविधता दर्शवतात आणि सामाजिक एकता वाढवतात, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचा आजचा पहिला गुढीपाडवा सर्वांनी उत्साहानं साजरा करावा, असं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांच्या शुभेच्छासंदेशात म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री-शुभेच्छा**

“विकासाची महागुढी उभारू या! राष्ट्रधर्म वाढवू या!”, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील लोकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. देशाच्या प्रगतीत राष्ट्रधर्माचा वसा घेतलेल्या महाराष्ट्राचा वाटा अनन्यसाधारण आहे. नूतन वर्ष राज्यातील शेतकरी, कष्टकरी, कामगारांच्या जीवनात आणि उद्योजकता, व्यापार - उदीम अशा सर्वच क्षेत्रात नवचैतन्य, ऊर्जा घेऊन येवो, अशी मनोकामना गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

**गुढीपाडवा-रॅली**

आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा ! शालिवाहन संवत्सरातील हिंदू नववर्षाचा पहिला दिवस असलेला गुढीपाडवा आज मोठ्या उत्साहात सर्वत्र साजरा होत आहे. यानिमित्त विविध संस्था आणि संघटनांच्या वतीनं सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. गुढीपाडवा ते रामनवमी या कालावधीत विविध राममंदिरांमध्ये उत्सव होणार आहेत.

**मनकीबात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देश-विदेशातील नागरिकांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, संकेतस्थळं, पंतप्रधान कार्यालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे यूट्यूब चॅनल आणि न्यूज ऑन AIR या ॲप वर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. त्यानंतर लगेच आकाशवाणीवरून प्रादेशिक भाषांमध्येही या कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

**<u>संभाजी-महाराज</u>**

“छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शानं पावन झालेले राज्यातील सर्व गडकोट किल्ले कायमचे अतिक्रमणमुक्त करण्याला प्रधान्य देण्यात येईल”, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुणे जिल्ह्याच्या शिरुर तालुक्यातील वढू इथं सांगितलं. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त काल आयोजित कार्यक्रमांत ते बोलत होते. यावेळी 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार' परमपूज्य रामगिरी महाराज यांना शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसंच इतर पुरस्कारांचं देखील वितरण करण्यात आलं.

वढू आणि तुळापूर इथं छत्रपती संभाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारण्याच्या प्रकल्पाचा विकास आराखडा तयार असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरूवात होईल. त्यासाठी निधी कमी पडणार नाही, अशी ग्वाही यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी दिली. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त काल ५ हजारांहून अधिक युवकांनी रक्तदानाचा संकल्प केला. समाधी स्थळावर छत्रपती संभाजी महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या स्मारकाला भेट देऊन अभिवादन केलं, यावेळी बोलताना ते म्हणाले –

----- बाईट –अजित पवार- 31 सेकंद ----

**<u>मुंबई-महापालिका</u>**

‘कार्यक्षम आणि शाश्वत जलव्यवस्थापन प्रणाली’ आणि ‘कर्करोगविषयक काळजी घेणारी कार्यप्रणाली’ अशा दोन्ही प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल नवी मुंबई महानगरपालिकेला देशातील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या ‘स्कॉच’ पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. नवी दिल्ली इथं ‘स्कॉच समीट’च्या 100 व्या विशेष समारंभात काल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी हे पुरस्कार स्विकारले. नवी मुंबईत पिण्याच्या पाण्यासाठी 85 टक्के मीटर जोडलेले असून पाण्याच्या सुयोग्य वापरावर काटेकोर लक्ष दिलं जात आहे, तसंच पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी प्रक्रियाकृत सांडपाण्याच्या वापरावर भर दिला जात असल्याची माहिती आयुक्त शिंदे यांनी दिली. महानगरपालिकेच्या स्थानिक पातळीवरील सर्व 26 नागरी आरोग्य केंद्रं आणि रूग्णालयात कर्करोगाची प्राथमिक तपासणी केली जात असून संशयित रूग्ण आढळल्यास त्यांना टाटा रूग्णालयात पुढील उपचारासाठी संदर्भित केलं जातं. आत्तापर्यंत 10 हजारहून अधिक महिलांची कर्करोग तपासणी करण्यात आली आहे

**<u>एम्स-नाप्रा</u>**

नागपूरच्या एम्समध्ये थॅलसेमिया आणि सिकलसेल ॲनिमिया यावर अत्याधुनिक उपचार उपलब्ध होणं आवश्यक असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल नागपूर इथं सांगितलं. नागपूर एम्सच्या पहिल्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.

वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सिकलसेल तसंच जनुकीय आजारावर अधिकाधिक संशोधन करण्याचं आवाहन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी यावेळी बोलताना केलं. यावेळी एम्स नागपूरचे अध्यक्ष डॉक्टर अनंत पंढरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<u>आय पी एल</u>**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेत काल गुजरात टायटन्स संघानं मुंबई इंडियन्सवर ३६ धावांनी मात केली. गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करताना साई सुधारनच्या ४१ चेंडूत केलेल्या ६३ धावांच्या जोरावर निर्धारित २० षटकांत ८ बाद १९६ धावा केल्या. मुंबईकडून हार्दिक पांड्याने सर्वाधिक दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल मुंबई इंडियन्सला २० षटकांत ६ गडी गमावून १६० धावा करता आल्या. सूर्यकुमार यादवनं २८ चेंडूत सर्वाधिक ४८ धावा केल्या. गुजरातकडून मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

**<u>शाळा सकाळी</u>**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांची वेळ सकाळच्या सत्रात करण्याचे निर्देश शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी आणि शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिले आहेत. त्यानुसार प्राथमिक शाळांसाठी सकाळी ७ ते सव्वा अकरा आणि माध्यमिक शाळांसाठी सकाळी ७ ते पावणेबारा अशी वेळ निश्चित करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागातील कमाल तापमानात वाढ नोंदवली गेली आहे. उद्या सकाळपर्यंतच्या अंदाजानुसार, हवामान कोरडं राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.